


# ॥ ज्योतिर्मय ॥

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २७० वा ❑ बुधवार दि.२४ डिसेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## अनेक नगरपंचायती अस्थिर राहण्याची शक्यता?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

नगर परिषद आणि नगरपंचायत निवडणुकांचे निकाल जाहीर झाले आहेत. या निवडणुकीत महायुतीचा दणदणीत विजय झाला आहे, तर महाविकास आघाडीला पुन्हा एकदा पराभवाचं तोंड पहावं लागलं आहे. राज्यात महायुतीचे तब्बल २१५ नगराध्यक्ष निवडून आले आहेत, तर महाविकास आघाडीला अवघ्या ४९ जागांवरच समाधान मानावं लागलं आहे. तर २४ ठिकाणी स्थानिक आघाडीचे नगराध्यक्ष निवडून आले आहेत. भाजप हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे, एकट्या भाजपचे राज्यात ११९ नगराध्यक्ष निवडून आले आहेत, तर शिवसेना ६० आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ३६ नगराध्यक्ष निवडून आले आहेत. दुसरीकडे महाविकास आघाडीमध्ये काँग्रेसचे ३२ नगराध्यक्ष पदाचे उमेदवार विजयी झाले आहेत, सर्वात जास्त फटका हा शिवसेना ठाकरे गटाला बसला असून, शिवसेना ठाकरे गटाचे राज्यात केवळ ९ च नगरसेवक निवडून आले आहे.

नगरांच्या निवडणुकीत राजकीय पक्षांनी वरील प्रमाणे जागा मिळविल्या काही नगरांमध्ये व पंचायतीमध्ये अध्यक्षासह पक्ष बहुमतात निवडून आले आहे तर तर काही नगरांमध्ये पंचायत निवडणुकीत अध्यक्ष एका पक्षाचा तर बहुमत दुसऱ्या पक्षाचे असे निवडणुकीचे परिणाम समोर आले आहे. अध्यक्ष एका पक्षाचा पण बहुमत मात्र दुसऱ्या पक्षाचे असताना अशा विचित्र राजकीय परिस्थितीत संघर्ष उफाळून येण्याची दाट शक्यता नाकारता येणार नाही.ज्या ठिकाणी नगराध्यक्ष एका पक्षाचा आणि बहुमत दुसऱ्या पक्षाचे अशा परिस्थितीत नगरांमध्ये राजकीय अस्थिरता राहण्याची दाट शक्यता आहे.ज्या नगरपरिषदांमध्ये की पंचायती मध्ये अध्यक्षाच्या पाठीशी बहुमत नाही,अशा नगरांमध्ये अध्यक्षांना निर्णय घेताना तारेवरची कसरत करावी लागणार आहे.विरोधक अध्यक्षांनी घेतलेल्या निर्णयाला विरोध करणार नाही हे कशावरून? विरोध होणारच! अशा परिस्थितीत संघर्ष उफाळून येण्याची शक्यता नाकारता येत नाही..उदा..राज्यात अनेक नगरमध्ये निवडून आलेले अध्यक्ष एका पक्षाचे तर नगरमधील बलाबल दुसऱ्या पक्षाचे.ही स्थिती अनेक नगरांची आहे.

उदा. पुणे जिल्ह्यातील शिरूर नगर परिषदेत बहुमत भाजपला तर नगराध्यक्ष अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा. वर्धा जिल्ह्यात अध्यक्ष काँग्रेसचा तर नगरसेवकांची संख्या सर्वाधिक भाजपाची आहे.

वर्धा जिल्ह्यातच देवळी तालुक्यात अध्यक्ष अपक्ष तर बहुमत भाजपला मिळाले.अशा परिस्थितीत अध्यक्षाला कार्य करणे,निर्णय घेणे अडचणीचे ठरणार असून अध्यक्षाला प्रभावीपणे कार्य करताना विरोध होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.नगर परिषदेत कोणताही निर्णय घेण्यासाठी सभागृहात ठराव मांडून तो मंजूर करून घेणे आवश्यक असते. मात्र, नगराध्यक्ष किंवा त्यांच्या पक्षाकडे बहुमत नसेल तर ठराव मंजूर होणे कठीण ठरणार आहे. परिणामी, कारभार सुरळीत चालवण्यासाठी नगराध्यक्षांना विरोधी पक्षाशी समन्वय साधावा लागणार आहे.

बहुमतअभावी अध्यक्षांना एक तर जुळवून घ्यावे लागेल..किंवा कुठलीतरी तडजोड करावी लागणार.. दोन्ही शक्यता संभव नसल्यास अशावेळी राजकीय संघर्ष निर्माण होण्याची दाट शक्यता नाकारता येणार नाही.

नगराध्यक्षांनी घेतलेला निर्णय विरोधकांना मान्य नसेल तर अशावेळी विरोधक अध्यक्षाविरुद्ध अविश्वासाचा ठराव देखील आणू शकतात आणि तो ठराव पारित झाला तर आदेशाला राजीनामा द्यावा लागतो अध्यक्षाविरुद्ध अविश्वास ठराव आणण्याची तरतूद नगर पालिका कायद्यात करण्यात आली आहे. नगराध्यक्षाला पदच्युत करण्यासाठी दोन तृतीय बहुमताची आवश्यकता असते.राज्यात नगराध्यक्षपदाची निवड ही थेट जनतेतून होते. मात्र, थेट जनतेतून निवडून आलेला नगराध्यक्ष आणि नगरसेवक हे वेगवेगळ्या पक्षांचे असल्याने नगर परिषदांचा खरा कारभारी कोण, असा पेच निर्माण होण्याची शक्यता आहे.

राज्यातील अनेक नगर परिषदांमध्ये नगराध्यक्ष एका पक्षाचा आणि सभागृहातील बहुमत दुसऱ्या पक्षाकडे गेलेले असल्याने पुढील पाच वर्षांचा कारभार आव्हानात्मक ठरण्याची शक्यता आहे. अशा ठिकाणी निर्णयप्रक्रियेत अडथळे, राजकीय संघर्ष आणि अस्थिरतेचे वातावरण कायम राहण्याची चिन्हे दिसत आहेत. निवडणूक प्रचारात दिलेली आश्वासने प्रत्यक्षात उतरवताना नगराध्यक्षांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

लोकशाहीत बहुमत आवश्यक आहे कारण ते सरकार स्थापनेसाठी, निर्णय घेण्यासाठी आणि कायद्यांना मंजुरी देण्यासाठी एक आधार देते, कायदे बनवणे, धोरणे ठरवणे यांसारख्या महत्त्वाच्या निर्णयांसाठी बहुमत आवश्यक असते. बहुतेक सदस्य एका बाजूने असल्यास निर्णय घेतला जातो.अनेक नगरांमध्ये ही परिस्थिती नाही.

राज्यात नगराध्यक्षांच्या निवडीसाठी थेट निवडणुकीचे तत्त्व स्वीकारले असून त्यानुसार निवडणुकाही झाल्या आहेत. या नवनिर्वाचित नगराध्यक्षांना वित्तीय अधिकार आणि स्थैर्य देण्यासह त्यांच्या कारभारात गतिमानता व पारदर्शकता आणण्यासाठी त्यांना विशेष अधिकार देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे .नगराध्यक्षांना अनेक वित्तीय अधिकार देण्यात आले आहेत.थेट निवडून आलेल्या नगराध्यक्षांना पहिली अडीच वर्षे पदावरून दूर करण्याची मागणी करता येणार नाही. त्यानंतर पदावरून दूर करण्याची मागणी केल्यास नगराध्यक्षांच्या गैरवर्तणुकीबाबतची ठोस कारणे नगरसेवकांना द्यावी लागणार आहेत.या आरोपांची चौकशी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत केली जाणार असून या चौकशीत दोषी आढळल्यास जिल्हाधिकारी शासनाकडे अहवाल पाठवतील व त्याआधारे शासनामार्फत नगराध्यक्षांना पदावरून दूर करता येईल.


प्रक्रियेतील या सुधारणेमुळे ठोस कारणांव्यतिरिक्त नगराध्यक्षांना पदावरून दूर करता येणार नाही. नगरपरिषद निधी व शासन अनुदानातून होणाऱ्या कामांना वित्तीय मंजुरी देण्याचे अधिकार नगराध्यक्षांना प्राप्त होतील.नगराध्यक्षांना पदावरून दूर करण्याची वरील प्रक्रिया स्पष्ट करण्यात आली तरी अध्यक्षांवर पदच्युतीची टांगती तलवार डोक्यावर कायम राहणार.हे मात्र तितकेच खरे!

# अहो, आश्चर्यम.... आमच्याकडे काहीच माहिती नाही !

## माहिती अधिकारात प्राप्त माहितीतून समोर आले हे धक्कादायक वास्तव

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – महाराष्ट्रातील राज्याची, केंद्राची शासकीय कार्यालये, प्रतिष्ठाने, मंडळे, अंगीकृत व्यवसाय, बँका, पोस्ट, विमा, सहकार क्षेत्र, इत्यादी तसेच अशासकीय कार्यालये इत्यादी यामधून पूर्णवेळ तसेच अन्य तत्त्वावर कार्यरत विविध श्रेणीतील अधिकारी, कर्मचारी यातील मराठी भाषिक किती व अमराठी भाषांपैकी हिंदीसह इतर कोण कोणत्या भाषेचे किती याची कार्यक्षेत्र व भाषावर किती या बाबतची कोणतीही माहिती, आकडेवारी यातले काहीच महाराष्ट्र सरकारकडे उपलब्धच नसल्याचे धक्कादायक वास्तव माहितीच्या अधिकारात प्राप्त माहितीवरून समोर आले आहे.



महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
९ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
दूरध्वनी क्र:- ०२२-२०८२२८३८ Email ID:-gad_२९a२@maharashtra.gov.in
नोंदणीकृत टपालाद्वारे
क्रमांक: माअअ-२०२५/प्र.क्र.१५२/समन्वय-२ दिनांक: १०.१२.२०२५


प्रति,
श्री. अभय कोलारकर,
प्लॉट नं. २, पडोळे ले-आऊट,
दिनदयाल नगर, नागपूर – ४४००२२

विषय:- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार माहिती मिळण्याबाबत.
संदर्भ:- आपला दिनांक १९.०९.२०२५ रोजीचा अर्ज.

महोदय,
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत आपला उपरोक्त विषयाबाबतचा दिनांक १९.०९.२०२५ रोजीचा अर्ज दिनांक १३.११.२०२५ रोजी या कार्यासनात प्राप्त झाला आहे.

२. उपरोक्त संदर्भाधिन माहिती अधिकार अर्जान्वये आपण "महाराष्ट्रातील राज्याची, केंद्राची शासकीय कार्यालये, प्रतिष्ठाने, संस्था, मंडळे, अंगीकृत व्यवसाय, बँका, पोस्ट, विमा, सहकार क्षेत्र इ. तसेच अशासकीय कार्यालये इ. यामध्ये पूर्णवेळ तसेच कंत्राटी व अन्य तत्वावर कार्यरत विविध श्रेणीतील अधिकारी, कर्मचारी यातील मराठी भाषिक किती व अमराठी भाषांपैकी हिंदीसह अन्य भाषक, कोणत्या भाषेचे किती याची शासकीय, अशासकीय तसेच कार्यक्षेत्र व भाषावार माहिती तपशीलवार उपलब्ध करून देण्याबाबत तसेच महाराष्ट्र सरकारचे नियुक्त्यांच्या संबंधात मराठी भाषकांचे व हिंदी तसेच अन्य भाषकांचे प्रमाण किती असावे याबाबतच्या धोरणाच्या शासन निर्णयाच्या, नियमांच्या प्रती उपलब्ध करून देण्यात याव्यात", अशी विनंती केली आहे.

३. प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभाग (DARPG)/सेंट्रलाइज्ड पब्लिक ग्रीव्हन्स रिड्रेस अँड मॉनिटरिंग सिस्टीम (CPGRAMS) यांच्याकडून पी.जी.पोर्टल वरील नागरिकांच्या तक्रारी सामान्य प्रशासन विभागातील समन्वय-२ या कार्यासनास पुढील कार्यवाहीसाठी प्राप्त होतात. सदर तक्रारीचा विषय विचारात घेवून त्या संबंधित विभागाकडे पाठविण्यासंदर्भातील कार्यवाही समन्वय-२ या कार्यासनाकडून केली जाते.



४. आपल्या माहिती अधिकार अर्जामधील नमूद विषयाच्या अनुषंगाने या कार्यासनाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली जात नसल्याने त्याबाबतची कोणतीही माहिती या कार्यासनाच्या अभिलेखामध्ये उपलब्ध नाही. यास्तव, या बाबतची माहिती आपणांस उपलब्ध करुन देणे शक्य नाही.

५. सदर माहितीने आपले समाधान न झाल्यास आपणांस अवर सचिव तथा अपीलीय अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन समन्वय-२, नवीन प्रशासकीय भवन, १९ वा मजला, मुंबई - ४०००३२ यांच्याकडे ३० दिवसांच्या आत अपील करता येईल.

आपला,
( गोविंद साबने )
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र शासन

उपराजधानीतील माहिती अधिकार कार्यकर्ते अभय कोलारकर यांनी ही माहिती सामान्य प्रशासन विभागाकडे मागितली होती. हा विभाग थेट मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारीत असतो हे विशेष. तरीही ही माहिती या राज्याकडे उपलब्ध नाही.

मागितलेल्या माहितीतील मराठी भाषिकांचे तसेच हिंदीसह अन्य भाषिकांचे प्रमाण किती असावे या बाबत शासनाचे धोरण काय याची देखील माहिती मागितली गेली होती. परंतु या बाबतची देखील कोणतीच माहिती उपलब्ध नसल्याचे कळवून सामान्य प्रशासन विभाग मोकळा झाला आहे.

एवढ्या महत्त्वाच्या आकडेवारीच्या अभावी राज्यातील मराठी माणसाच्या रोजगार वृद्धी बाबत शासन धोरण मग ठरवते तरी कसे की त्याची कोणतीच गरज मराठीचे केवळ कोट्यवधी रुपये खर्च करून गौरव सोहळे तेवढे करणाऱ्या शासनाला वाटतच नाही असा प्रश्न यातून निर्माण झाला आहे.

अशा माहितीच्या अभावी हे राज्य मराठी हितासाठी कसे काय चालवले जाऊ शकते आणि राज्यातील रोजगार, नोकऱ्या यात मराठी माणसाचे हित मग कसे काय सांभाळले जाऊ शकते असा प्रश्न अभय कोलारकर यांनी उपस्थित केला आहे.


राज्यातील शासकीय, अशासकीय क्षेत्रातील रोजगार, नोकऱ्या यात मराठी माणसे किती व अमराठी किती ह्याची कोणतीही आकडेवारी, माहितीच शासनाकडे नाही. मराठी भाषकांचे राज्यातील नोकऱ्या, रोजगार यात प्रमाण किती असावे याचे कोणतेही धोरणही नाही.

मुख्य म्हणजे ही सर्व माहिती ज्या सामान्य प्रशासन विभागाचे हे काम आहे त्यांनीच ती जिथे उपलब्ध असेल तिथून घेऊन वा त्यांच्याकडे संबंधित अर्ज पाठवून अर्जदाराला ती पुरवली जाईल हे बघणे माहिती अधिकार कायद्यानुसार बंधनकारक आहे.

सामान्य प्रशासन विभागाने माहिती उपलब्ध नसल्याचे तेवढे कळवत हात झटकून या कायद्याची देखील पायमल्ली केली आहे असे अभय कोलारकर म्हणाले.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ: भारतीय राष्ट्रजीवनातील एक प्रभावी आणि लोकोपयोगी शक्ती

**ज्योतिर्मय साहित्य**




भारतीय संस्कृती, परंपरा, सामाजिक संघटनशक्ती आणि राष्ट्रनिर्माण यांचा इतिहास पाहिला तर, काही संस्था केवळ त्यांच्या कार्यामुळे नव्हे तर त्यांच्या मूल्यांमुळे जनमानसात स्थान मिळवतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ () ही अशीच एक संस्था आहे जी आपल्या शताब्दीच्या प्रवासात भारतीय समाजजीवनाच्या प्रत्येक स्तरावर आपला ठसा उमटवत आली आहे. संघाचे कार्य केवळ शाखांपुरते किंवा विचारप्रसारांपुरते मर्यादित नसून, ते शिक्षण, आरोग्य, ग्रामविकास, आपत्ती निवारण, सांस्कृतिक पुनरुत्थान, सामाजिक समरसता आणि राष्ट्रनिष्ठा अशा विविध क्षेत्रांत जिवंतपणे अनुभवायला मिळते. संघाची मूलतत्त्वे 'स्वयंसेवा', 'शिस्त', 'चरित्रनिर्माण' आणि 'सामाजिक ऐक्य' या मूल्यांवर आधारलेली आहेत. संघात प्रत्येक स्वयंसेवकाला केवळ वैयक्तिक प्रगती किंवा कार्यकुशलता यावरच नव्हे, तर समाजहितासाठी सतत जागरूक राहण्याची प्रेरणा देखील दिली जाते. सन १९२५ मध्ये डॉ. केशव बलिराम हेडगेवार यांनी स्थापलेला हा संघ आज भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रवादी प्रवाहाचा अविभाज्य भाग बनला आहे. संघाचे कार्य केवळ विचारप्रसारापुरते मर्यादित नसून, ते समाज जीवनाच्या प्रत्येक स्तरावर पोहोचले आहे. शिक्षण, सेवा, संस्कार आणि राष्ट्रनिर्मिती या सर्व क्षेत्रांत संघाचे योगदान ठळकपणे दिसते. संघाची स्थापना ही राजकीय सत्तेच्या प्राप्तीसाठी नव्हे, तर भारतीय समाजाच्या सांस्कृतिक आणि नैतिक पुनरुत्थानासाठी झाली आहे. 'व्यक्तिनिर्माणातून राष्ट्रनिर्माण' ही संघाची मूलभूत संकल्पना आजही संघाच्या प्रत्येक कार्यात प्रतिबिंबित होते. २७ सप्टेंबर १९२५ रोजी, विजयादशमीच्या पावन दिवशी नागपूर येथे डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी हिंदू समाजातील संघटनशक्ती जागृत करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. सुरुवातीच्या काळात या संस्थेला कोणतेही औपचारिक नाव देण्यात आले नव्हते. मात्र १९२६ साली 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' हे नाव अधिकृतपणे निश्चित करण्यात आले. त्यानंतर २८ मे १९२६ रोजी संघाची पहिली नियमित शाखा सुरू झाली.



प्रा. कौशिक म. हरणे
नूतन महाराष्ट्र एस्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी, पुणे
मो.क्र: ९६७३१७५१९७

संघाच्या संघटनात्मक विकासाला पुढील काही वर्षांत अधिक गती मिळाली. १९२७ मध्ये अधिकारी प्रशिक्षण शिबिरांची सुरुवात झाली, १९२८ मध्ये प्रतिज्ञा सोहळ्यांद्वारे स्वयंसेवकांमध्ये बांधिलकीची भावना दृढ करण्यात आली, तर १९२९ मध्ये संघटनात्मक पदांची रचना निश्चित करण्यात आली. या सर्व प्रक्रियांमुळे संघाची अंतर्गत रचना अधिक मजबूत, शिस्तबद्ध आणि कार्यक्षम बनली. प्रारंभीच्या काळातच संघाने शिस्त, संघटन आणि राष्ट्रभावना ही तीन मूलभूत मूल्ये आपल्या कार्याचे केंद्रबिंदू मानली. संघाची विचारधारा 'हिंदुत्व' या राष्ट्रवादी स्वरूपाचे आहे. भारतभूमी, तिची संस्कृती, परंपरा आणि इतिहास यांच्याशी असलेली आत्मीय नाळ म्हणजेच 'हिंदुत्व' असे संघ मानतो. संघाची प्रमुख कार्यपद्धती म्हणजे 'शाखा प्रणाली'. या प्रणालीअंतर्गत स्वयंसेवक दररोज उघड्या मैदानात एकत्र येतात. शाखेमध्ये शारीरिक प्रशिक्षण, सामूहिक खेळ, देशभक्तीपर गीत, बौद्धिक चर्चा आणि संस्कारात्मक उपक्रम यांच्या माध्यमातून स्वयंसेवकांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडविण्यावर भर दिला जातो. या शाखा प्रणालीमुळे संघाचा विचार समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचण्यास मदत झाली आहे. संकल्पनेवर आधारित आहे. मात्र संघ मांडत असलेले हिंदुत्व हे धार्मिक नसून सांस्कृतिक आणि

संघाच्या प्रेरणेतून समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये कार्य करणाऱ्या अनेक संस्थांची निर्मिती झाली आहे. या सर्व संस्था स्वतंत्रपणे कार्यरत असल्या तरी त्यांचा मूलाधार एकच आहे निःस्वार्थ राष्ट्रसेवा. शिक्षण, समाजकार्य, कामगार चळवळ, आदिवासी विकास, सांस्कृतिक जतन आणि राजकीय क्षेत्र अशा विविध अंगांनी या संस्था राष्ट्रनिर्माणाच्या प्रक्रियेत सक्रिय योगदान देत आहेत.

**(क्रमशः)**

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख - १२३



*'ज्योतिर्मय'च्या वाचकांचा निरोप घेणारा हा लघुलेख लिहीतांना फार कृतज्ञ भावना आहेत. भरभरून प्रतिसाद तर मिळालाच परंतु लेखक- वाचक हे 'नातं' या लघुलेख मालेमुळे दीर्घ झालं. दृढ झालं. आजच्या अखेरच्या लघुलेखात आपण 'शततारका' या नक्षत्राची देवता "वरुण" यांच्याबद्दल जाणून घेवुया...!!*

*१२ आदित्यां पैकी एक असलेल्या 'वरुण' या देवतेचा पृथ्वीवरील सर्व 'पाण्या' वर अधिकार आहे. स्वतःचे नियम स्वतः बनवून सर्व देवांना सदर नियम पाळायला लावणाऱ्या 'वरुण' देवाचा अधिकार किती मोठा आहे... याची कल्पना यायला मदत होईल. 'जलदेवता' हा प्रमुख मान त्यांच्या कडे असून विश्वाची व्यवस्था आणि मनुष्याच्या मनांतील विचार त्यांना कळत असल्यामुळे या साऱ्यांचे हिशोब ही देवता ठेवते.*


*"पूर्वा भाद्रपदा" नक्षत्राची देवता "अजैकपाद" किंवा "अजैकचरण" आहे. 'अज' म्हणजे न जन्मणारा व 'पाद' म्हणजे प्रकाश रेषा. ही देवता अग्निचे रूप आहे. आकाशातील विद्युल्लतेचे रूप म्हणजे 'अजैकपाद' होय. अत्यंत बलिष्ठ अशी ही "निसर्गदेवता" आहे. प्रकोपापासून रक्षण करण्यासाठी हया देवतेची प्रार्थना केली जाते. "उत्तरा भाद्रपदा" या नक्षत्राची देवता "अहिर्बुद्ध्न्य" आहे. एकादश रुद्रांपैकी एक "अहिर्बुधन्य" आहे. "अहि" हे "वृत्त' नावाच्या बलिष्ठ राक्षसाचे नांव आहे. "बुधन्य" म्हणजे अंतरिक्षाचा तळाकडचा भाग म्हणून 'अहिर्बुध्य' ही अंतरिक्षातील देवता असावी असे जाणकारांचे मत आहे. "चाक्षुषोपनिषद" याची रचना "आहिबुधन्य" ऋषीने केली आहे.*

*२७ नक्षत्रांमधील अखेरचे नक्षत्र" रेवती" ची देवता "पूषा" आहे. "पूषा" दाढी आहे. त्याच्या जवळ अग्नि व अंकुश आहे. त्याच्या हातात सुवर्णाची गदा आहे. त्याच्या रथाला घोड्यां ऐवजी "बकरे" जोडलेले आहेत. तो शक्तिमान आहे. तो पशुपालक आहे. ऋग्वेदात 'पूषा' ला सूर्याचा दूत असेही म्हटलेले आहे. हरवलेली वस्तु परत मिळवण्यासाठी 'पुषा' ला उद्देशुन याग (यज्ञ) करावा असे "अश्वलायन गृह्यं सुत्रांत" सांगितलेले आहे. १२ आदित्यांपैकी ही एक देवता आहे. प्रवासाला निघण्यापूर्वी "पूषा" या देवतेला बळी देतात. बळी म्हणून "कोहळा" घराच्या उंबरठ्यावर कापतात. त्यामुळे लांबचा प्रवास निर्विघ्न पार पडतो.*

*येणे प्रमाणे, आपण "वास्तुशास्त्र पेंटींग" साठी रंगवताना कोणकोणत्या घटकांचा किती संक्षेपाने अभ्यास पूर्वक अंतर्भाव करतो याची थोडीशी कल्पना या प्रदीर्घ लघुलेख मालेतून यायला मदत होईल.*

क्रमश :

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




## जात्यावरच्या ओव्या......

देवाजीच्या पुजेसाठी
सोनचाफ्याची फुले
गुणगुणत भुपाळी
माझे तनमन डुले ||४११||

देवाजीच्या पुजेसाठी
पाना फुलांची आरास
गोपुर सुरेख
धुपदिपाचा सुवास ||४१२||


©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## हरवलेल्या रानवाटा




ज्योतिर्मय साहित्य

असं म्हणतात की आपल्याला सुखानं जगायचं असेल तर भूतकाळाचा आणि भविष्यकाळाचा विचार करू नये. वर्तमान आपल्या हातात असतो. वर्तमानात आनंदात जगावे. ना कालचे दुःख, ना उद्याची चिंता ! तसे तर हे खरेच आहे. पण कधी कधी भूतकाळातील आठवणींचा कप्पा अचानक उघडला जातो. जणू एखादी सुगंधी कुपी अचानक उघडली जावी आणि त्यातल्या सुगंधाचा दरवळ सगळीकडे पसरावा तसे होते. मग दोनचार दिवस मन त्याच धुंदीत विहार करते. ध्यानीमनीही नसताना जणू कालचक्र उलटे फिरते आणि शरीर जरी वर्तमानात असलं तरी मन मात्र त्या काळात विहार करून येतं.




परवाच्या दिवशी अचानक आमच्या गावी खूप दिवसांनी जाण्याचा योग आला. खरं तर खूप वर्षांनी. शहरातले पाहुणे माझ्याकडे आले आणि त्यांनी त्या गावाला जाण्याचा इच्छा व्यक्त केली. आता रस्ता चांगला झाल्याने अर्ध्या तासातच तिथे पोहोचता येतं. मग काय सकाळी सकाळीच पोहोचलो तिथे. तिथे जाताना एक अनामिक हुरहूर मनात होती. कसं असेल हे माझं गाव आता ? ओळखेल का ते मला ? या गावात जो विश्वास नावाचा छोटा मुलगा काही वर्षे वावरला, त्याच विश्वासला आता हे गाव स्वीकारेल ? बरोबर आहे, त्याने नाही ओळखले तर त्याला कसा दोष देता येईल ? मी तर आता अंतर्बाह्य बदललो आहे. बालपणीचा निरागस चेहरा, काळे कुरळे केस, बालपणीचा अवखळपणा, हुंदडणे सगळेच काळाच्या उदरात गडप झाले आहे. ती शेतं, ती झाडं, शेतातली ती विहीर की जिच्या थंडगार पाण्याने माझी अनेकदा तहान भागवली होती, ती सगळी मला ओळखतील ? मला म्हणतील का, ये, खूप दिवसांनी आलास. विसरला होतास का रे आम्हाला ?

खरं तर मी त्यांना विसरलेलो नसतोच. विसरणे शक्यही नसते. मनाच्या एका कोपऱ्यात ती सगळी मंडळी सुखाने राज्य करीत असतात. काळरूपी दिवसांचे पक्षी भुर्कन उडून गेलेले असतात. आठवणींची फुले सुकली असली तरी त्यातील मंद मंद सुगंध कधी तरी वेड लावतो. अशा वेळी मो. रफीच्या एका सुरेख गाण्याच्या ओळी आठवतात. याद न जाये, बिते दिनोंकी... पण काळाच्या ओघात ती शेती विकली गेली असल्यामुळे त्या गावाला जायचे काही कारण उरत नाही. म्हणून खूप वर्षे त्या गावाला गेलो नाही एवढेच. पण शेती विकली तरी आठवणी थोड्याच विकल्या जातात ! त्या तर अनमोल असतात. खरं तर अशा बाबतीत परमेश्वराचे, मनाचे किंवा नियतीचे आभार मानावे तेवढे कमीच ! कारण सगळ्याच गोष्टी विकाऊ असलेल्या या जगात आठवणी, सुखदुःखे, प्रेम, भावभावना यासारख्या गोष्टी विकता किंवा खरेदी करता येत नाहीत. जर त्यांची खरेदी विक्री होतच असेल, तर त्या खऱ्या तरी कशा म्हणायच्या ? पण एक गोष्ट मात्र किती छान आहे ! या आठवणी, ही सुखदुःखे वाटून घेता येतात. त्यातून आनंद देता अन घेता येतो. **(क्रमशः)**




ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏

## जेथे भगवंताचें नामस्मरण तेथे सर्व संतांचें ठाण



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

जोंवर धरिली जगाची आस । तोंवर परमात्मा दूर खास ।। परमात्म्याची प्राप्ति । न होई राखता विषयासक्ति ।। जग विषयाकार राहिले । तेथे प्रेम केले तरी घातासी आले ।। विषयी एकजीव झालो जाण । सुटता न सुटे आपण जाण ।। मान, अपमान, जगाचे सुख-दुःख । हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण ।। अभिमानात परमात्म्याचे विस्मरण। हें जीवपणाचें मुख्य लक्षण।। सुख-दुःख, विपत्ति - आपत्ति,। ही माया प्रपंचाची ओहोटी भरती।। आत्मनिश्चय बाणल्यावांचून। माया न हटे न सुटे जाण।। आता करी शूर मन। मायेसी हटवावे आपण।। जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें।। एकच वस्तूची ओळखण जाण । पूर्ण होते समाधान।। ज्याच्यांत मानावें मी सुख। त्याच्यातच उद्भवतें दुःख।। नराचा होय नारायण। जर न चुकला मार्ग जाण।। जेथे ठेवावी आस। त्याचे बनावें लागतें दास।। देह तो पंचभूतांचा। त्याचा भरवसा न मानावा फारसा।। मी तुम्हांस सांगतों हित। दृश्यांत न ठेवावें चित्त।। दृश्य वस्तु नाशिवंत असते। भगवत्कृपेने समाधान येतें।।

परिस्थिति नसे बंधनास कारण। असे आपलेच मनाची ठेवण ।। देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण।। विषयाचा नाही झाला जोंवर त्याग। तोंवर रामसेवा नाही घडत सांग।। आपलें आत्यंतिक हित। हेंच खरा स्वार्थ जाण।। चित्तीं जे विषयापासून सुटले। ते आनंदासी आले।। रामनाम प्रेमयुक्त चाले धणी। त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी ।। द्रव्यदारावर्जित जाण। ही खरी संताची खूण।। सृष्टि पाहावी भगवदाकारी । प्रेम ठेवील त्याचेवरी। त्याला नाही दुसरी सरी ।। आल्यागेल्यास द्यावे अन्नदान। मुखानें भगवंताचें नाम। हृदयांत रामाची प्रीति। यासच थोर म्हणती जीवन्मुक्ति ।। न धरावी जगाची आस। तोच होऊ पाहे रामदास।। नामांत संत । नामीं भगवंत ।। वृत्ति राखावी अत्यंत शांत । हेंच संताचें मुख्य लक्षण जाण ।। जेथे भगवंताचें नामस्मरण । तेथे सर्व संतांचें ठाण।। अगरबत्ती जळून गेली। परि सुवासाने राहिली। तैसे रामचरणी झाले जे लीन । तेच खरे जिवंत जाण ।। संतचरणीं झाला लीन । त्याला भाग्यास नाही दुजें उणें। संताची संगति । भगवन्नामानें साधते ।। देहासकट माझा प्रपंच । रामा केला तुला अर्पण ।। ऐसें वाटत जावें चित्तीं । कृपा करील रघुपति ।।



## भगवान श्रीकृष्णाची लीला स्थाने

संकलन : मधुकर बोरीकर

## संत श्री नरसिंह मेहता

ज्योतिर्मय साहित्य



संतश्रेष्ठ श्री नरसी मेहता उर्फ नरसिंह मेहता यांचा जन्म गुजरात मधील तळोजा येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव कृष्ण दामोदर वडनागर होते. त्यांचे वडील न्यायव्यवस्थेमध्ये महत्त्वाच्या स्थानी होते. पण नरसी यांच्या बालपणीच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. आणि त्यानंतर त्यांच्या पालन पोषण करण्याची जबाबदारी त्यांच्या मोठ्या बंधू कडे गेली.

असे म्हणतात नरसिंह मेहता आठ वर्षाचे होईपर्यंत मुकेच होते. त्यांना बोलता येत नव्हते. त्यांच्यावर एका कृष्ण भक्त साधूने कृपा केली व ते बोलायला लागले. जशी प्रभू कृपेने त्यांना बोलण्याची शक्ती प्राप्त झाली, त्याच बरोबर भक्तीच्या बीजाची रुजवातही त्या साधू कृपेनेच झाली.

लहानपणापासूनच ते भगवत चिंतनात मग्न असायचे. साधू संतांची सेवा करावी असे त्यांना नेहमी वाटे.

मोठे झाले तरी त्यांचे मन व्यवसायात रमत नव्हते. सतत प्रभू चिंतनात ते दंग असायचे. अर्थार्जन काही नाही. केवळ नामचिंतन आणि संत सेवा.

त्यांच्या मोठ्या भावाची पत्नी त्यांच्या अशा या खुशाल चेंडू पणामुळे वैतागली व सतत टाकून बोलायला लागली. येता जाता अपमान करणे, हे नित्याचे झाले.


तशात त्यांचे लग्नही लावून देण्यात आले. त्यावेळी असे वाटले की कदाचित पत्नीची जबाबदारी आल्यावर तरी नरसी मेहता सुधारतील व काही अर्थार्जन करायला लागतील. पण नरसी मेहता यांच्या मधे विवाह मुळे कुठलाच बदल झाला नाही. त्यांचे अखंड नामस्मरण सुरूच राहिले.

पूर्वी ते शिवभक्त होते. महादेवाच्या मंदिरात जाणे, तिथली स्वच्छता करणे, प्रेमाने प्रभुची पूजाअर्चा करणे दिवाबत्ती करणे. असा दिवसभर त्यांचा कार्यक्रम चालू असे.

त्यांची निरलस सेवा पाहून त्यांचेवर गोपीनाथ महादेव यांची कृपा झाली. नरसी मेहता यांना कृष्ण लीलांचे दर्शन घडवण्यासाठी प्रत्यक्ष महादेव त्यांना घेऊन गोलोकधाम मध्ये गेले. रात्री चालू असलेली ती रास पहात असताना त्यांचे हातात एक जळती मशाल देण्यात आली. राधाकृष्ण यांच्या युगलमूर्ती इतकी विलोभनीय दिसत होत्या की कोणाचेही भान हरपेल. जगाला मोहित करणारा कृष्ण त्यांना प्रत्यक्ष दिसत होता.ती रास त्यांच्या मनात इतकी ठसली की ते भाव विभोर झाले आणि बेभान अवस्थेत हातातली पेटती मशाल जळजळत, हातही जळतोय हे त्यांच्या ध्यानी सुद्धा आले नाही. जेंव्हा रास संपली तेव्हा भगवान श्रीकृष्णाने स्पर्श करून नरसी मेहता यांचा हात पूर्ववत केला. या महान अनुभूतीनंतर नरसी मेहता हे परम कृष्ण भक्त झाले.

त्यांची ही भक्ती त्यांच्या भावजईस अजिबात पटत नव्हती. आर्थिक कमाई काही नाही, आणि नुसते आमच्या संसारावर भार. असे म्हणून तिने यांना घराबाहेर काढले.

नरसी मेहता व त्यांच्या पत्नी यांनी दूर जंगलात महादेवाच्या मंदिराशेजारीच एक झोपडी बांधून तिथे राहायला सुरुवात केली. नरसी मेहता चे तरीही पूर्ण लक्ष श्रीकृष्ण भक्तीत अखंड रमलेले असायचे. त्यांना, पत्नीला आणि मुलांना खायला काही आहे किंवा नाही हे पाहण्याचे ही भान त्यांना नसायचे. त्यांच्या मनाची अशी पक्की धारणा होती की ,आपण परमार्थाची काळजी करावी व प्रपंच भगवंतावर सोडून द्यावा. **(क्रमशः)**



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## चतुर्दश ब्रम्हाचा गणेशवंदन

ज्योतिर्मय साहित्य

दशक ७ समास १

जो गजवदन आहे, सर्व विद्याचा अधिष्ठाता आहे. जो एकदंत आहे ज्याच्या हातात परशु त्रिशूळ, गदा चारही वेदांची संहिता आहे. जो लंबोदर आहे. ज्याचे वर्णन करण्यासाठी आपले अवघे आयुष्य खर्च केले तरी कमी आहे. विद्येच्या चांदण्याने शोभणारा असा जो चंद्र आहे त्यालाही गणपती वंदन करतो. म्हणजे गणपती हा पूर्णब्रह्म आहे तो पूर्ण चंद्र असल्याने आपल्यातल्या ज्ञानसमुद्राला भरती येते. त्याच्यापाशी सर्व कर्तृत्त असल्याने तो उगमस्थान आहे. सर्व विश्वाच्या पलीकडे श्रेष्ठ स्वरूप तोच आहे सर्वांच्या आधी आणि सर्वांच्या नंतर जसाच्या तसा दिसणारा स्वयंभू तोच आहे. तो ज्ञानमयी आणि विज्ञानमयी आहे. मुळारंभी आहे. संकटदूर करणारा आहे. ज्याला आपण सहस्त्रनामाने जपध्यान करू शकतो

असा कर्ता, धर्ता व हर्ता असा हा गजानन आहे. व ऊंदीर हेत्याचे वाहन आहे. गणेशवंदन हा काही थोड्या शब्दात लिहिण्याचा विषय नाही, आकाशाचा कागद व समुद्राची शाई करून लिहिले तरी ते कमी पडेल असा हा आपला सगळ्यांचा लाडका बाप्पाला शतकोटी नमन

चतुर्दश ब्रम्हाचा शारदावंदन ‘‘या देवी सर्व भुतेशु बुध्दीरूपेण संस्थिता नमस्तये नमस्तये नमस्तये नमो नम:‘‘

नमस्कार वाचक मित्रांनो. दिवाळीच्या सणाचा गोडवा प्रत्येक भारतीयांच्या मनात आहे. कालच दिवाळीचा सण संपला तेव्हा आपण या समासाच्च्या रूपाने श्रीगणेश माता शारदा व सद्गुरूंच्या चरणी वंदन करून पुढच्या समासाचे निरूपण करूया, **(क्रमशः)**



## आरोग्य संजीवनी

## तुमचा मूड अचानक चढ-उतार होतोय? कदाचित व्हिटॅमिन डी कमी आहे!

ज्योतिर्मय साहित्य

आज मस्त वाटतंय
उद्या काहीच करू वाटत नाही
कधी रडायला येतं,
कधी चिडचिड होते,
कधी सगळं रिकामं वाटतं
का बरं असं होतंय?

कदाचित यामागे तुमचं ‘मन’ नाही, तर तुमचं ‘व्हिटॅमिन डी जबाबदार असू शकतं.

व्हिटॅमिन डी म्हणजे फक्त हाडं नव्हे ‘मनाचं’ही पोषण,

बऱ्याच जणांचा गैरसमज असतो की व्हिटॅमिन डी फक्त हाडांसाठी लागतो.

पण खरंतर हे ‘सनशाईन व्हिटॅमिन ’ मेंदूतल्या मूड केमिकॅल्स वरही परिणाम करतं.

व्हिटॅमिन डी आणि मेंटल हेल्थ यांचं नातं:

कमी व्हिटॅमिन डी असलं, की श्रेोटोनीन, डोपामाईने हे हैप्पी हॉरमोनस कमी तयार होतात.

यामुळे लो मूड, उदासीनता, चिडचिड, नैराश्य (डिप्रेशन) येऊ शकतं.

झोपेचं चक्रही बिघडतं थकवा, कंटाळा आणि बेचैनी वाढते.

तुम्हालाही हे लक्षणं आहेत का?

सकाळी उठल्यानंतरही थकल्यासारखं वाटणं

दिवसभर निरस वाटणं किंवा काही करायची इच्छा न होणं

कोणाशी बोलायची किंवा भेटायची इच्छा होत नाही

चिडचिड वाढलेली वाटते

एकटं, उदास वाटणं

खरंतर काही त्रास नाही, पण ‘‘बरे वाटत नाही’’

तर एकदा व्हिटॅमिन डी टेस्ट करून पाहा

शरीर सांगत असतं, पण आपण ऐकत नाही!

मग उपाय काय?

सकाळी २०-३० मिनिटं उन्हात बसा

शक्यतो ८:३० च्या आधीचा सूर्यप्रकाश मिळवा.

डॉक्टरांच्या सल्ल्याने व्हिटॅमिन डी सप्लिमेंट घ्या

टेस्ट केल्याशिवाय अंदाजाने घेऊ नका.

फॅटयुक्त नैसर्गिक अन्न खा:

जसे लोणी, तूप, दूध, बदाम, बिया (फ्लॅक्स, सनफ्लॉवर)

मन शांत ठेवण्यासाठी ध्यान / ब्रेथिंग एक्सरसाईस करा

जे मूड सुधारायला मदत करतं.

‘‘मन, शरीर, आणि सूर्य या तिघांचं एक खास नातं आहे‘‘

मनाला मोकळं ठेवायचं असेल, तर शरीरात सगळ्या नुट्रीऐंट्स असाव्या लागतात.

व्हिटॅमिन डी हा त्यातला एक महत्त्वाचा सोल्जर आहे.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

म्हातारपण लवकर नको?

तारुण्य टिकवण्यासाठी हे उपाय नक्की करा!

तरुणांनाच काय, वयोवृद्धांनाही चिरतरुण राहायचं असतं. पण त्यासाठी काही गोष्टी नियमित केल्या तर वाढतं वय थांबवता येतं.

खाली दिलेले उपाय आयुष्यात अमृतासारखे ठरू शकतात.

शरीराला शुद्ध ऑक्सिजन मिळू द्या!

-दीर्घ श्वसन करा, प्राणायाम करा

-फुफ्फुसं मजबूत राहतील, पेशींना नवी ऊर्जा मिळेल

-म्हातारपण दूर राहील

‘‘प्रत्येक पेशीला ऑक्सिजन दिला, की शरीर झाडासारखं टवटवीत राहतं!‘‘

**(क्रमशः)**



## लघु बोधकथा

### ♦ गुलाबाचं देखणेपण ♦

*व्हॅलेंटाइन दिवस आला होता. एक गुलाब फार उदासीत होतं. कारण त्याचे शेजारी मित्र तरुण व टवटवीत असल्यानं ते केव्हाचेच संगत सोडून निघून गेले होते आणि तो थोडासा टवटवीत व देखणा नसल्यानं त्याला कोणीही नेलं नव्हतं. सायंकाळ झाली होती. एक म्हातारा व्यक्ती आला. त्यानं त्याला घेतलं. गोंजारलं व तो चालता झाला. ते गुलाब रस्त्यानं त्या म्हाताऱ्यासोबत चालत होता असतांना अनुभवत होता की रस्त्यावर त्याचे मित्र पडले आहेत. त्यावर कोणीतरी पाय देत त्याला तुडवून चालले आहेत. तसं त्याचं त्याला फार दुःख झालं व स्वतःला आणखी दुःख अनुभवावं लागणार असं त्याला वाटलं. तोच तो म्हातारा एका मंदिरात गेला. त्यानं त्याच कोमेजलेल्या फुलाला देवाच्या पायावर अर्पण केलं व नतमस्तक होवून तो माघारी फिरला. आज त्या फुलाला धन्य वाटत होतं व ते आपल्या देखणं नसल्याबद्दलही हळहळत नव्हतं.*

*बोध- कधीकधी गुण महत्वाचे असतात. देखणं असणं तेवढं महत्वाचं नसतं.*

# मराठी भाषा ज्ञानभाषा कशी होईल !

ज्योतिर्मय साहित्य

मनुष्य जन्माविषयी विचार केला तर अनेक गुढ तत्वांचा शोध लागला आहे त्याला विचाराचं देवाणघेवाणीच कोंदण लाभलं आहे. मराठी ही आपली ✻✻मायभाषा✻✻ आहे संवादाचे माध्यम म्हणून भाषे कडे पाहिले पाहिजे. मनुष्य आपल्या प्रगतीसाठी साठी सतत धडपडत असतो तो आपल्या आजूबाजूला घडत असलेल्या घटना बारकाईने शोधतो, विकास करतो व वाढवतो. यामध्ये अनेक विचारांची व विषयांशी आपला परिचय होतो. हे सर्व भाषा या माध्यमातून होत असते. आमची मराठी ही मातृभाषा आहे. तर देवनागरी ही मराठीची वर्णलिपी आहे. मित्रांनो नदीचं मुळ ऋषीचं कुळ विचारू नये म्हणतात ! तोचं नियम भाषेला पण लागतो.

भाषेचा अभ्यास करण्यासाठी त्याची पूर्णपणे माहिती मिळवावी लागते. म्हणून काही नियम बाजूला ठेवून अभ्यास करावा लागतो. आमची मायमराठी भाषा सुध्दा नदीच्या काठावर निर्माण झाली. कारण हे आहे की नदीच्या काठावर मानवी वस्ती निर्माण झाली. पाण्याची उपलब्धता आहे म्हणले की मानवी वस्ती वाढते.बोलण्याचे व्यक्त होण्याचे साधन म्हणून भाषेचा जन्म होतो. पूर्वापार मानवी वसाहत नदीच्या तीरावर होती म्हणून नदीच्या काठावर भाषा निर्माण झाली असावी असा अनुमान निघतो. नंतर लेखनकला वाढीसाठी अनेकांनी प्रयत्न केले. अनेक ऋषी मुनींनी, विचारवंतांनी तिला सजवलं अभ्यास पूर्ण लेखन करून एक अनमोल ठेवा पूढच्या पिढीला दिला. आणि तिचं महत्व वाढवलं . ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या ‘‘पसायदाना मुळे ते विश्वात्मक झालं त्यानंतरच्या पिढीने जतन करून मराठी भाषा गौरवशाली केली. अनेक



मान्यवर विद्वानांनी आपले आयुष्य मराठी संवर्धनासाठी पणाला लावले. मराठी भाषेचा अभ्यास केला त्यांच्या योगदाना मुळे मराठी भाषा राजभाषा म्हणून गौरवाने मिरवते आहे आणि याचा मला गर्व व अभिमान आहे. ज्ञानविजय, भक्तिविजय, या अतिप्राचीन ग्रंथ संपदे बरोबर ती ज्ञानेश्वर महाराजांच्या रूपात विश्वात्मक आहे. अवघ्या जगाला आपलंस करण्याचं सामर्थ्य तिच्यात आहे. तर तुकाराम महाराजांच्या अभंगातून कधीही भंग न होण्याचं सामर्थ्य माझ्या मराठीत आहे. प्रत्यक्ष विश्वाचं आर्त मनामध्ये ठसवणारी माझी मराठी आहे.

मराठी भाषेचं अस्तित्व २/३ हजार वर्षाचं आहे. मी वरती म्हणाले की अनेक विद्वानांनी तिच्या अभ्यासासाठी आयुष्य वेचले अनेक ग्रंथ मग ते आयुर्वेदाचे ज्ञान सांगणारे असोत की वैज्ञानिक दृष्टीकोन असलेले ग्रंथ भांडार असो ही सर्व वैचारिक संपत्ती आहे. व हजारो धार्मिक ग्रंथ आहेत. की त्याचा अभ्यास करायचा म्हणले हे आयुष्य अपूरे पडेल. एवढी मोठी ग्रंथ संपदा मराठीत असल्याने मराठी भाषा समृध्द आहे. आचार, विचार, सभ्यता यांचा सर्व समावेश मराठीत आहे. व्याकरण,शब्दांची जुळवाजुळव, प्रासंगिक विनोद, जीवाला हलकेफुलके करणारी, नि:संशय आनंद देण्याचा बहुमान मराठी भाषेकडे आहे. आणि दुधात साखर जशी विरघळेल तशी सर्वांना सहज समजणारी भाषा आहे. ✻तिला राजाश्रय मिळाला तर सरस्वतीच्या सारस्वत लेकरांचा तो बहुमान असेल तर ही मराठी पायाभूत कशी आहे ? याचा विचार केला तर मराठी ✻वर्णमालेमध्ये अ आ पासुन सुरवात होते व अं आ: पर्यन्तचे बारा स्वर आहेत म्हणजे त्याला बाराखडी म्हणतात.



सौ उज्वला धर्माधिकारी
पुणे. 75882 35646

अ ते ज्ञ पर्यत शब्दलिपी म्हणजे मराठी होय. आपण शाळेत पहिले पाऊल ठेवले की आपल्याला सर्व प्रथम बाराखडीची ओळख होते.

मित्रांनो आपल्या भाषेची गंमत बघा हं स्वर,व्यंजन,अनुनासिक शब्द,जोडाक्षरे, -हस्व दिर्घ, पहिली वेलांटी दुसरी वेलांटी, पहिला ऊकार दुसरा ऊकार दोन पाकळ्यांचा शब्द, शेंडीफोड्या शब्द, पोटफोड्या शब्द अशा अनेक गमतीदार शब्दांच्या कोंदणात ठेऊन तिला अलंकृत करता येते.

पूर्ण विराम,अर्धविराम, स्वल्पविराम अवतरण चिन्ह,प्रश्नचिन्ह,ऊद्गार वाचक चिन्ह या सर्व आशयघन शब्दानी भाषेचा गोडवा वाढतो. मराठी भाषेला वळवावी तशी वळते. दर बारा कोसावर ती बदलते.. अशी ही साधीसोपी मराठी भाषा आहे. भजन पोवाडे किर्तन, कवन,याबरोबरच ज्ञान विज्ञान दायकम् अशी मराठी भाषा आहे.

मराठी भाषा ज्ञानभाषा व्हायला हवी असेल तर सरकार दरबारी तिला योग्य न्याय मिळाला पाहिजे. महाराष्ट्रात जेवढ्या शैक्षणिक संस्था आहेत त्यासर्व शाळेत मराठी सक्तिची केली पाहिजे. सर्वत्र मराठीचा वापर केला पाहिजे शाळा कॉलेज मध्ये मराठी चे वेगवेगळे ऊपक्रम राबवले पाहिजेत मुलांना प्रोत्साहित केले पाहिजे. त्यांच्या कडून मराठी विषयावर वेगवेगळ्या परिक्षा घेऊन ,मराठी साठी वाड:मय मंडळे स्थापन केली पाहिजेत. कुसुमाग्रज, केशवसुत, वि,दा करंदीकर, पु,ल देशपांडे, प्र,के अत्रे,स्वातंत्रवीर सावरकर, साने गुरुजी,बहिणाबाई चौधरी अशा अनेक दिग्गज लेखकांनी मराठी जोपासली त्यांच्या नावाने प्रत्येक तालुका स्तरांवर खेड्यापाड्यात, शहरातील सोसायटी मध्ये जुन्या जाणत्या लोकांना बरोबर घेऊन साहित्य संपदा वाढवली पाहिजे त्यांच्याच मार्गदर्शनाखाली विज्ञान शिबिरे घेऊन विज्ञान मराठी मध्ये शिकवलं पाहिजे. या साठी मी थोर शास्त्रज्ञ जयंत नारळीकरांचे विषेश आभार मानते त्यांनी यावर विपूल लिखाण केले आहे. आणि हे लिखित व खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकवलं पाहिजे. विद्यार्थी केंद्र बिंदू मानला व त्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिले तर आजचे विद्यार्थी ऊद्याचे सुजाण नागरिक होणार आहेत ते ज्या क्षेत्रात त्यांना गोडी वाटेल ते सर्व परकीय भाषेतील अर्थशास्त्र, विज्ञानशास्त्र, शरिरशास्त्र, अंकशास्त्र, खेळ, सौदर्यशास्त्र, राज्यशास्त्र असे अनेकविध शास्त्रांचा आपल्या मराठी लेहेजानुसार शब्दांची मांडणी करतील अनेक देश विदेशात तिची गोडी लागेल. कारण ती रसाळ,मधूर,अविट गोडीची आहे आणि ज्ञानेश्वर महाराजांच्या पसायदानातील आता विश्वात्मके ही ओळ सार्थ होईल. हे अशक्य नाही त्यासाठी सर्वत्र प्रचार प्रसार झाला पाहिजे. घर,घराभोवतीचा परिसर,शाळा कॉलेज बरोबर सरकारने मराठी ची चाललेली अवहेलना थांबवून तिला प्रोत्साहन दिले पाहिजे हे कुणा एकट्या दुकट्याचे काम नाही यासाठी जात,धर्म,पंथ सगळं विसरून सर्वांनी एकत्र येऊन मराठी साठी आस्था दाखवली पाहिजे. मी आशा करते तो दिवस दूर नाही. मराठी ज्ञानभाषा होईल अशी श्री गणेशाला व शारदा मातेला वंदन करूते. परमात्मा आपली ईच्छा पूर्ण करेल अशी आशा करते, जय महाराष्ट्र! साहित्य संमेलन जवळ आलं आहे. आपल्या प्रयत्नांना यश आले आहे. अशा अनेक लेखांचा समावेश एकत्र येऊन मराठीचा सन्मान झाला. यासाठी कृतज्ञता व्यक्त करते.

# हे समिंदरा..(२)

ज्योतिर्मय साहित्य

‘‘धन्यानु,ओ धन्यानू ‘‘

करत पारो समिंदराच्या दिशेने धावली.

समुद्राच्या दिशेने धावणाऱ्या पावलांचे ठसे रेतीमध्ये अगदी इंचभर खोल जात होते.

‘‘किती वाट बघाय लावलंस, मका धन्यानु‘‘

‘‘तुमची वाट बघून माका डोल्यातलं पाणी डोल्यातच आटून गेलाव धन्यानू.‘‘

‘‘किताक होतव ओ धन्यानू.‘‘

‘‘तुम्ही ठिक हाव ना, तुम्हाले कुठे इजा त नाही झाली ना.‘‘

‘‘नाय नाय गो पारो, म्या ठीक हाव.‘‘

‘‘पण तू जरा शांत होशीन का.‘‘

‘‘तुम्ही मला सांगाल धनी...‘‘

‘‘हाव हाव पारो, सांगतलो तुले.‘‘

‘‘जरा उसासा त घे गो‘‘

मावळतीला चाललेल्या सूर्याचा पिवळा तांबूस रंग समुद्राच्या पाण्यावर पसरला होता. अन् त्यामध्येच महादेवची लांब अशी सावली समुद्राच्या लाटांवरून पाण्यावर हेलकावे खात समुद्राच्या काठाकडे येत चालली होती. पारोचा आनंद तर गगनात मावत नव्हता. तिने लागलीच एक सुरमई पकडली आणि समिंदरचे आभार मानले.

समुद्राच्या काठावर अवाक नजरेने पाहणारे कोळी वाड्यातील अनेक नजरा महादेव वर खिळल्या होत्या.

ते विशेष डोळे लांबूनच महादेव निरखत होता. त्यामध्येच एक अवाक नजरेने पाहणारी ती इवलीशी नजर समुद्रातून बाहेर येताच महादेव ने ओळखली.

‘‘पिंटो?‘‘

‘‘बापूस‘‘

‘‘केवढा मोठा झालो रे, माझा बाबू , माझा पिंटो‘‘

पिंटोला उचलून घेत महादेवाने त्याचे पापे घेत आनंदाने एक गिरकी घेतली.

‘‘जना, तू तो खूप मोठी दिसायले.‘‘

‘‘हम्म काहो, महादेव भाऊ!‘‘

‘‘अरे राजा, ये तुझ्या दोस्तांच्या गले नाही लागणार का?‘‘



‘‘दोस्तां कुठे हुतास रे बाबा इतकी वर्षे. ‘‘

बोलत बोलत सगळे कोळीवाड्याच्या दिशेने गेले.

पारो तर कोण आनंद झाला होता.

तिने आज पुन्हा महादेव साठी झटपट सुरमई माशाचे कालवण, भाकरी अन् बोंबलाची चटणी केली. अन् बाप लेकराला जेवायला वाढले.

‘‘तू पण बस ना गं पारो आम्हा सोबत जेवायला.‘‘

‘‘हाव ,मी पण घेते धन्यानु, माला आधी डोळभरून पाहून घेऊ दे दोघा बाप लेकराले.‘‘

जेवण झाले, महादेव ने बाजले काढले अन् पिंटो ला घेऊन तो अंगणात बाजल्यावर विसावला.

‘‘आता सांगाल धन्यानु, काय झाला ते‘‘

‘‘हाव सांगतो,‘‘

त्या दिशी म्या आपल्या होडी स पाण्यात लोटले अन् गाणे गात गात मी होडी चालवित होतो.

‘‘मका, कळलेच नाही म्या कुठवर आलोव ते.‘‘

जाळे टाकले आणि आकाशकडे नजर लागली.



सौ.वैशाली चंद्रकांत महाडिक.
श्री क्षेत्र निनाम -सातारा
सं. क्र.-९७६७४३७९२३

एवढ्यात कुठून कसे वादळ आले माला काही भान नव्हते. माका नेमकी तेव्हां तंद्री लागली होती. आणि सो सो वारा वाहू लागला. अन् मग मला कळले आपण वादळात सापडलो ते. म्या हडबडीत होडी वळविली, पण वाऱ्याच्या झोतात होडी हेलकावे खात होती. त्या चक्री वादळात मी कुठ हाय ते ही लक्षात येत नव्हते. अन् दूरवरून फक्त मका तुझा फक्त धूसर आवाज कानी पडत होता. म्या लगबग करीत तुझ्याकडेच येत होतो. पण एका क्षणाला होडी उलटली. मी शिडाचा आधार घेत होडी पर्यंत जाण्याचा प्रयत्न केला. पण चक्री वादळात मला घेरी आल्यासारखे झाले आणि नाकातोंडात पाणी जाऊन होत्याचे नव्हते झाले. होडी उलटली अन् जेंव्हा मी शुद्धीवर आलो.तेंव्हा इथून जवळ जवळ १५० मैलावर मी एका वैद्य बाबांच्या घरी होतो. शुद्ध आल्यावर त्यांनी मला सांगितले.

त्यांना मी समुद्राच्या काठावर भेटलो होते. त्यांनीच मला दवा देऊ देऊ बरे केले. आणि मला विचारले तुझे नाव काय? गावं काय? पण माझी शुद्ध हरपली होती.

त्यामुळे मी कोण आहे हे मलाच माहीत नव्हते तर मी त्यांना काय सांगणार. काहीच आठवत नसल्याने ते ही काही करू शकत नव्हते.

तिथल्या स्थानिक लोकांना माहिति होते की मी त्यांना समुद्र किनारी सापडलो आहे. आणि मला काही आठवत नाही. त्यामुळे मी त्यांच्यापाशी राहू लागलो. त्यांचीही अवस्था माझ्यासारखी होती. त्यामुळे त्यांना ही माझा आधार वाटू लागला. जेंव्हा तुला शुद्ध येईल तेंव्हा तुझ्या घरी जा असे त्यांनी मला सांगितले.

त्यांच्या घरातील भिंतीवर त्यांच्या मुलीचा अन् मुलाचा फोटो होता.

मुलगी लग्न होऊन तिच्या सासरी होती. तिच्या वडिलांच्या विरोधात जाऊन तिने लग्न केले होते. त्यामुळे तिचा अन् त्याचा कुठलाही संबंध नव्हता. त्यांचा तरुण मुलगा ही अशाच एका अपघातात गेला होता. त्यामुळे ते ही खूप दुःखी होते. मुलांच्या आठवणींवर ते जगत होते. माझ्या जाण्याने त्यांना ही एक आधार मिळाला. एक विशेष सांगायचे म्हणजे त्यांच्या घरातील त्या फोटोमध्ये मला नेहमी एक आपलेपणा जाणवायचा. पण का ते आत्ता कळले. माझ्या कपड्यांवरून त्यांना माझ्या कामाचा अंदाज आला होता. त्यामुळे आपले मासेमारीचेच काम तिथे सुरू होते. अशाप्रकारे वर्षामागून वर्ष वाऱ्यासारखी भुर्रकन केंव्हा उडून गेली ते सुद्धा लक्षात आले नाही.

आणि मागच्या चार दिवसांपूर्वी तिथे असेच एक वादळ आले. ते वादळ समिंदर राजाने जणू माझ्यासाठीच आणले होते की काय माहीत नाही. त्या वादळाने माझ्या जीवनाला अशी कलाटणी दिली, आणि मी जातानाचे तुझे ‘‘माघारी फिरावं धन्यानु, माघारी फिरावं धन्यानु.‘‘ काय होत होते माहीत नाही. ते स्वर माझ्या कानावर आदळू लागले. आपली पारो महादेव नावाची होडी मला दिसू लागली. आणि हेलकावे खाताना पुन्हा मी शिडाचा आधार घेतला. आणि त्याच वेळेला

त्या वादळात माझी स्मरण शक्ती परत माघारी आली. आणि माझे पूर्व आयुष्य आठवले. आणि काही क्षणात ते वादळ शांत झाले. मी घरी आलो.

वैद्यबाबा घरीच होते. घरी येताच मी तो फोटो पाहिला अन् मला पुन्हा घेरी आली तो फोटो कुणाचा होता ते मी तुला दाखवणारच आहे...! पण मला एक वाटते पारो, आपण त्या बाबांना आपल्याकडे आणुयात !

‘‘हाव चालेल की धन्यानु.‘‘

‘‘ज्यांनी माझ्या धनीना सांभाळले. त्यांचे ऋण मी या जन्मात नाही फेडू शकणार. पण एकदा नक्की भेटूया त्यांना.‘‘

‘‘मला दाखवा ना फोटो धनी.‘‘

‘‘तो फोटो हा आहे बघ पारो‘‘

‘‘बघू बघू धन्यानु.‘‘ फोटो पाहून

ही तर मीच हाय धनी, हा माझा भाऊ राजा, अन् हे तर माझे बापू, हाये धन्यानु, माझे बापू ...!‘‘

वरील कथेत काही शब्दांची अदलाबदल किंवा वेगळेपण ही असू शकते. त्याबद्दल क्षमस्व,पण यातून कोणाच्या भावना दुखावण्याचा हेतू नाही.

✻✻✻




# पिठापुरम

ज्योतिर्मय साहित्य



आज आपण आंध्र प्रदेशातील पूर्व गोदावरी जिल्ह्यातील पिठापुरम या तीर्थ स्थळास भेट देणार आहोत.

पिठापुरम हे अत्यंत महत्त्वाचे धार्मिक स्थळ आहे. श्री दत्तात्रयांचे प्रथम अवतार श्रीपाद श्रीवल्लभ यांचे हे जन्मस्थान आहे.

येथील महत्वाची मंदिरे

१. श्रीपाद श्रीवल्लभ मंदिर २. श्री व कुक्कुटेश्वर स्वामी मंदिर ३. पूरूहुतिका देवी मंदिर. ४. कुंती माधव मंदिर

५. अनघा देवी दत्त मंदिर.

पिठापुरम हे स्थान श्रीपाद श्रीवल्लभाच्या जन्मा पूर्वी पासूनच दत्त क्षेत्र म्हणून ही प्रसिद्ध आहे.इथे दत्तप्रभुंची स्वयंभू मुर्ती आहे.


ज्यावेळेस माता सतीने दक्षाच्या यज्ञात योगाग्नी द्वारे देह अर्पण केला, त्यावेळेस भगवान शिव दु:खीत व क्रोधीत झाले. त्यांनी मातेचा देह खांद्यावर घेऊन आकाशात भयंकर असे तांडव नृत्य सुरू केले. त्यांच्या या क्रोधामुळे ब्रह्मांडाचा विनाश होईल की काय अशी भीती वाटायला लागली. ब्रह्मांडाला संरक्षण मिळावे व महादेवांचा क्रोध कमी व्हावा म्हणून विष्णूंनी आपल्या सुदर्शना चक्रा द्वारे माता सतीच्या देहाचे ५२ तुकडे केले व ते भारतभर सर्वत्र विखुरले गेले. त्या तुकड्या पैकी प्रत्येक तुकडा जिथे जिथे पडला तिथे तिथे मातेचे शक्तीपीठ स्थापित झाले. यानुसार मातेच्या कुंक्रवाचा डावा भाग पिठिका पुरम येथे पडला व तेथे शक्तिपीठ निर्माण झाले. पुरुहुतीका माता या नावाने मातेचे जाज्वल्य स्थान पिठिकापुरात आजही उपलब्ध आहे. पुरुहुतीका या शब्दाचा अर्थ जिला देवतांनी यज्ञात आहुती अर्पण करून प्रसन्न करून घेतले अशी माता.

ज्यावेळेस सतीचा देह त्याग झाला, त्यानंतर सर्वत्र अशांतता अंधकार पसरला.तमोगुण वाढीस लागला. म्हणून पीठिकापूर येथे देवतांनी भगवंताची आराधना केली व त्यातून ब्रह्मा विष्णू व महेश यांचे एकत्रित रूप म्हणून दत्तात्रयाची स्वयंभू मूर्ती अवतीर्ण झाली व हे स्थान पुन्हा पवित्र शांत व धर्म कार्यासाठी उपयुक्त असे स्थान झाले.

पिठापुरास दक्षिण काशी व पाद गया असे म्हणतात

गया सुर नावाचा एक महाकाय राक्षस होऊन गेला. हा असुर असूनही प्रभुभक्तीत सतत मग्न असे. त्याला असा वर मिळाला होता की जो त्याचे दर्शन घेईल त्याला मोक्ष मिळेल. बिहार मधील गया ते पिठापूर असा त्याचा देह प्रचंड व्यापलेला होता, म्हणून अनेक लोक विनासायास त्याचे दर्शन घेऊ शकत असत. आणि मोक्ष मिळवू शकत होते. कर्माचा हिशेब चुकता न करता ही विनासायास मोक्ष मिळू लागल्याने भगवंताच्या नियमात अडचणी येऊ लागल्या.

(क्रमशः)










# साने गुरुजी

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आज भारत मातेचे थोर सुपुत्र, स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची जयंती. साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणापासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता. श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत. साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सदभावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वाबलंबनाचे धडे दिले. सेवावृत्ती शिकवली. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. कांदबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे.



त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे. त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत. १९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. काँग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो... या गीताने तरुणांना स्फुरण चढले या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्रभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले. या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. साने गुरुजींना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

***

# घामाने भिजलेली माती कवितासंग्रहाचे लवकरच प्रकाशन

## शेतकरी पुत्राच्या लेखणीतून उमटणार बळीराजाचे वास्तव


**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** ग्रामीण भागातील मातीचा सुगंध आणि तिथल्या कष्टाची चव ज्याने जवळून अनुभवली आहे, अशा एका ध्येयवेड्या तरुण शिक्षकाच्या लेखणीतून घामाने भिजलेली माती हा कवितासंग्रह लवकरच साहित्याच्या दालनात येत आहे. कन्नड तालुक्यातील खेडा येथील रहिवासी असलेले संदीप संगीता नानासाहेब वाकडे यांनी आपल्या शब्दांतून शेतकरी जीवनाचे जळजळीत वास्तव मांडले असून, पुणे येथील लीला साहित्य पब्लिकेशनतर्फे पुस्तक प्रकाशित होणार आहे.

स्वतः एका शेतकरी कुटुंबात वाढलेल्या संदीप वाकडे यांनी बालपणापासूनच कष्ट, जिद्द आणि वेदना यांचा अनुभव घेतला आहे. शिक्षण पूर्ण करून शिक्षक म्हणून कार्यरत असतानाही, मातीशी असलेली त्यांची नाळ कधीही तुटली नाही. शेती करताना येणारा निसर्गाचा लहरीपणा, अतिवृष्टीमुळे पिकांचे होणारे नुकसान, कधी दुष्काळ तर कधी पुराचे संकट आणि त्यातून निर्माण होणारी आर्थिक ओढाताण त्यांनी अत्यंत जवळून पाहिली आहे. याच अनुभवांना शब्दांची धार देऊन त्यांनी हा काव्यसंग्रह साकारला आहे.

या संग्रहामध्ये एकूण ६१ कवितांचा समावेश असून, माय, बाप, धनत्रयोदशी शेतकऱ्याची, मातीच्या अश्रूंची कहाणी आणि हमीभाव यांसारख्या कविता वाचकांच्या काळजाला हात घालणाऱ्या आहेत. केवळ दुःखाचे प्रदर्शन न करता, बाजारातील अनिश्चितता आणि सावकारी पाश यांसारख्या संकटातही जिद्दीने उभा राहणारा शेतकरी कवीने यात प्रभावीपणे मांडला आहे.

संदीप वाकडे यांनी हा काव्यसंग्रह आपल्या कुटुंबाचा आधारस्तंभ असलेल्या आजी गं.भा. सखुबाई चंद्रभान वाकडे आणि कठीण परिस्थितीत आयुष्य फुलवण्यासाठी कष्ट उपसणारे आई-वडील सौ. संगीता व नानासाहेब वाकडे यांना कृतज्ञतापूर्वक अर्पण केला आहे. या लेखन प्रवासात त्यांना कन्नड तालुका साहित्य परिवाराचे संस्थापक डॉ. शिवाजी हुसे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रोत्साहन देणाऱ्या चाहत्यांमुळेच ही लेखणी अधिक प्रगल्भ झाल्याचे कवीने आवर्जून नमूद केले आहे.




मातीत घाम गाळणाऱ्या प्रत्येक हाताच्या संघर्षाची साक्ष देणारा हा कवितासंग्रह मराठी साहित्य विश्वात शेतकऱ्यांचा बुलंद आवाज ठरेल, असा विश्वास साहित्यप्रेमींकडून व्यक्त केला जात आहे. या पुस्तकाच्या रूपाने ग्रामीण साहित्याला एक नवा पैलू मिळणार असून, लवकरच प्रकाशनाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




# संधीला सकारात्मक प्रयत्नातून वाटचाल केल्यानेच जीवन विकास होत असतो – श्रीनारायणजी चांडक

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**फुलगांव–** आज फुलगांव ता. हवेली जि. पुणे येथिल श्री. नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिकी विद्यालय येथे अमेरिकेतील हिंदु स्वयंसेवक संघाचे संघचालक व विवीध सामाजिक कार्याचा सुगंध असलेले समाजभूषण श्रीनारायणजी चांडक यांनी संगम पावर च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रबोधनात्मक विचार प्रगट केले. शैक्षणिक दृष्टीकोन असलेले दिपक जी पायगुडे यांच्या विचारातून निर्माण झालेले सैनिकी शिक्षण संस्थेचे बहारदार वृक्ष पहायला मिळतो ! त्यावेळी प्राचार्य नरहरी पाटील, उपप्राचार्य विकास तरकुंडे, पांडूरंग जगताप, सोमनाथ आवचार व विद्यार्थी उपस्थित होते. याप्रसंगी जीवन कौशल्य विकासचे संकल्पक गिरीधर राठी, डॉ.श्याम कुलकर्णी, सुधिर अलकरी उपस्थित होते. सैनिकी शाळेच्या माध्यमातून सर्वांगिण विकासाची दिशा देणार्या संस्थेच्या उपक्रमा ची प्रशंसा विचारवंत चांडकजी यांनी मुक्त कंठाने केली.



# विरंगुळा केंद्र आणि नाट्यगृहासाठी ज्येष्ठांचे आ. जगताप यांना निवेदन


**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**पुणे –** मासिक बैठका तसेच वर्षभर विविध कार्यक्रमांच्या आयोजनासाठी ज्येष्ठ नागरिकांना विरंगुळा केंद्र आणि रसिकांसाठी वैविध्यपूर्ण कलांचा आस्वाद घेण्यासाठी पिंपळे सौदागर येथे नाट्यगृह उपलब्ध करुन देण्यात यावे अशी मागणी ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्यावतीने पिंपरी चिंचवड विधानसभेचे आ. शंकर जगताप यांना एका निवेदनाद्वारे करण्यात आली. पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उन्नती सोशल फाउंडेशनच्या प्रांगणात सोमवारी सायंकाळी भाजपच्या इच्छूक उमेदवारांचा परिचय मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला मार्गदर्शन करण्यासाठी आ. शंकर जगताप तसेच पिंपरी चिंचवड भाजपाचे शहराध्यक्ष शत्रृघ्न काटे यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्याप्रसंगी उन्नती सोशल फाउंडेशनचे संचालक संजय भिसे आणि शत्रृघ्न काटे यांच्या माध्यमातून आ. जगताप यांना सदरील निवेदन देण्यात आले. विशेष म्हणजे निवेदनाचे सविस्तर वाचन करुन विरंगुळा केंद्र आणि नाट्यगृहाच्या उभारणी बाबत आ. जगताप यांनी सकारात्मकता दर्शवित ज्येष्ठांचे समाधान केले. याप्रसंगी ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाष पवार, उपाध्यक्षा शकुंतला शिंदे, सचिव सखाराम ढाकणे तसेच सुभाष पाटील, विवेकानंद लिगाडे, शोभा राजगुरे, निर्मला कासार, भामिनी महाले, अशोक येळंमकर, रमेश चांडगे, अनिलकुमार शाह, रमेश वाणी, दिलिप चौगुले, सुभाष विधाते, अशोक कलाल, विमल मोंढेकर हे पदाधिकारी उपस्थित होते.

# कवी प्रदीप बडदे यांच्या ''माणुसकीची अंत्ययात्रा'' या काव्यसंग्रहास पद्मश्री स्मिता पाटील शब्दपेरा पुरस्कार

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**नाशिक –** साहित्य क्षेत्रात अनेक वर्षे लिखाण करत असताना कवी/लेखक/पत्रकार प्रदीप बडदे यांचा पहिला कवितासंग्रह ''माणुसकीची अंत्ययात्रा'' ललित पब्लिकेशन, मुंबई तर्फे नुकताच प्रकाशित झाला. माणुसकीच्या अंतापर्यंत जाऊन तिच्या पुनर्निर्मितीचा शोध घेणाऱ्या या संग्रहाची गिरणा गौरव प्रतिष्ठान, नाशिकने दखल घेत संस्थेच्या वतीने त्यांना पद्मश्री स्मिता पाटील शब्दपेरा पुरस्कार जाहीर करण्यात आला. साहित्य उपेक्षितांचे या मासिकाचे ते कार्यकारी संपादक असून मुंबई, ठाणे, नागपूर, पुणे व गुजरात येथील विविध साहित्यिक मंचावर संचालक व मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहेत. प्रदीप बडदे हे गेल्या २० वर्षांपासून साहित्यक्षेत्रात कार्यरत असून राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व राष्ट्रस्तरीय अशी ५० हून अधिक पारितोषिके व पुरस्कार त्यांना प्राप्त आहेत. गिरणा गौरव प्रतिष्ठान, नाशिकचा स्मिता पाटील शब्दपेरा पुरस्कार सोहळा हा अखिल भारतीय लोककला शेकोटी साहित्य संमेलनादरम्यान दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ठीक १ वाजता नाशिक येथे होणार असल्याची माहिती संस्थेचे कार्याध्यक्ष रवींद्र मांजुलकर आणि प्रा.राजेश्वर शेळके यांनी दिली आहे. या कार्यक्रमाचे स्वरूप आणि नियोजन खूप भव्य व देखणे असते, शिवाय या कार्यक्रमाला पाहुणे, साहित्यिक, पत्रकार, समाजबांधव, लोकसंगितकार, कलाकार व चाहत्या प्रेक्षकवर्गाची आवर्जून उपस्थिती लाभणार आहे. प्रदीप बडदे यांच्या काव्यसंग्रहाला हा पहिलाच पुरस्कार जाहीर झाला असून या सन्मानाबद्दल साहित्य क्षेत्रात चर्चा व कौतुक केले जात आहे. मित्रपरिवार, चाहते आणि हितचिंतकांकडून त्यांच्यावर शुभाशिर्वाद आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.






**करिअर कट्टा राज्यस्तरीय '' प्रकाशन संपादकीय समिती'' तसेच ''करिअर कट्टा राज्यस्तरीय समिती आणि गर्जे मराठी ग्लोबल, अमेरिका'' समिती सदस्य पदी निवड झाल्याबद्दल आज शंकरराव भेलके महाविद्यालय, नसरापूर येथे महाविद्यालय विकास समिती निमित्त प्राचार्य नामनिर्देशित प्रतिनिधी (महाविद्यालय विकास समिती) प्रा. भगवान केशव गावित (ग्रंथपाल) म्हणून उपस्थित होतो याप्रसंगी पुणे जिल्हा शिक्षण मंडळ संस्थेचे मानद सचिव तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, अधिसभा सदस्य आदरणीय अँड.संदीप कदम साहेब यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सुप्रसिद्ध विनोदी लेखक आणि सकाळ वृत्तपत्रचे उपसंपादक सु. ल. खुटवड (सदस्य), शिवाजीराव कोंडे (सदस्य), डॉ.रोहिदास ढाकणे (सदस्य) महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार शितोळे व इतर सदस्य उपस्थित होते.**

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559